## BOMBAY ACT No. LXX OF 1959.

### THE BOMBAY EXECUTION OF DECREES (TEMPORARY POSTPONEMENT) ACT, 1959.

मुंबई विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमति दिनांक २५ डिसेंबर १९५९ रोजीं मिळालेली असल्यामुळें तो याद्वारें सर्व लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

एन्. के. द्रविड,
मुंबई सरकारचे सचिव, विधि विभाग.

## BOMBAY ACT No. LXX OF 1959.

**AN ACT TO PROVIDE FOR RELIEF TO AGRICULTURISTS BY WAY OF TEMPORARY POSTPONEMENT OF INSTITUTION OF SUITS IN, AND EXECUTION OF DECREES PASSED BY, CIVIL COURTS IN AREAS THAT ARE FOR THE TIME BEING AFFECTED BY NATURAL CALAMITIES.**

## सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७०.

[राज्यपाल यांची संमति मिळाल्यानंतर, "मुंबई राजपत्रांत" दिनांक २८ डिसेंबर १९५९ रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध करण्यांत आला.]

**नैसर्गिक आपत्तीमुळें त्या त्या वेळीं परिणाम झालेल्या क्षेत्रांतील दिवाणी न्यायालयांत दावे दाखल करण्याचें काम व अशा न्यायालयांनीं दिलेल्या हुकूमनाम्यांची अंमलबजावणी तात्पुरती लांबणीवर टाकून शेतकऱ्यांना साहाय्य देण्याची तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, पिकें बुडाल्यामुळें किंवा दुष्काळ, आग, अवर्षण, पूर किंवा अशा इतर नैसर्गिक आपत्तीमुळें त्या त्या वेळीं नुकसान झालेल्या क्षेत्रांतील दिवाणी न्यायालयांत दावे दाखल करण्याचें काम व अशा न्यायालयांनीं दिलेल्या हुकूमनाम्यांची अंमलबजावणी तात्पुरती लांबणीवर टाकून शेतकऱ्यांना साहाय्य देण्याची तरतूद करणें आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, असें साहाय्य जेथें अशा आपत्तींमुळें राज्य सरकारनें जमीन महसुलाची सूट दिली असून टंचाईची किंवा दुष्काळी परिस्थिति असल्याची घोषणा केली असेल किंवा जमीन महसुलाच्या वसुलीची सूट दिली असेल किंवा वसुली तहकूब केली असेल अशा क्षेत्रापुरतेंच मर्यादित ठेवणें इष्ट आहे ;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या दहाव्या वर्षी याद्वारें पुढील प्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :—

भाग १.

## प्रारंभिक.

लघु संज्ञा, व्याप्ति व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास मुंबईचा हुकूमनाम्यांची अंमलबजावणी तात्पुरती लांबणीवर टाकण्याबाबत अधिनियम, १९५९, असें म्हणावें.

(२) तो सबंध मुंबई राज्यास लागू होईल.

(३) हा भाग आणि भाग ४ ताबडतोब अंमलांत येतील. पिकें बुडाल्यामुळें किंवा दुष्काळ, आग, अवर्षण, पूर किंवा अशा इतर नैसर्गिक आपत्ती आल्यामुळें राज्य सरकारनें ज्या क्षेत्रांत जमीन महसुलाची सूट किंवा तहकुबी दिली असेल आणि त्याशिवाय टंचाईची किंवा दुष्काळी परिस्थितीची घोषणा केली असेल अशा क्षेत्रांत राज्य सरकार राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें निर्दिष्ट करील अशा तारखेस भाग २ हा अंमलांत येईल आणि या कारणासाठीं निरनिराळ्या क्षेत्रांसाठीं निरनिराळ्या तारखा नेमतां येतील. भाग ३ हा, वर सांगितलेल्या नैसर्गिक आपत्तींपैकीं कोणत्याहि आपत्तीमुळें जेथें सरकारनें जमीन महसुलाची तहकुबी किंवा सूट दिली असेल अशा क्षेत्रांत आणि राज्य सरकार राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें तेथील अशा तारखेस अंमलांत येईल आणि या कारणासाठीं निरनिराळ्या क्षेत्रांसाठीं निरनिराळ्या तारखा नेमतां येतील.

(४) भाग २, किंवा यथास्थिति भाग ३ हा, राज्य सरकारनें राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें तो कोणत्याहि क्षेत्रांत किंवा त्याच्या कोणत्याहि भागांत अंमलांत असण्याचें बंद होईल असें तत्पूर्वींच घोषित केलें नसेल तर, राज्य सरकारनें राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें, ज्या क्षेत्रांतील किंवा त्याच्या भागांतील टंचाईची किंवा दुष्काळी परिस्थिति संपल्याची घोषणा केली असेल किंवा यथास्थिति, जमीन महसुलाची तहकुबी किंवा सूट बंद केली असेल असें क्षेत्र किंवा भाग असणार क्षेत्र किंवा भाग म्हणून किंवा ज्या तारखेस वरील गोष्टी करण्यांत आल्या असतील ती तारीख असणारी तारीख म्हणून सरकारनें राजपत्रांत निर्दिष्ट केलें असेल अशा क्षेत्रांत किंवा भागांत आणि निर्दिष्ट केली असेल अशा तारखेस अंमलांत असण्याचें बंद होईल.

व्याख्या.

२. या अधिनियमांत संदर्भावरून अन्यथा अर्थ लावणें आवश्यक नसेल तर,—

(अ) "शेतकरी" या संज्ञेचा अर्थ, जो इसम स्वतः किंवा त्याच्या नोकरां-मार्फत किंवा कुळाकरवीं, मुंबई राज्याच्या हद्दींत पूर्णतः किंवा मुख्यत्वेंकरून शेतीनें आपली उपजीविका चालवितो किंवा जो साधारणपणें त्या हद्दींत स्वतः अंगमेहनतीनें शेतीचें काम करतो असा इसम, असा समजावा ;

स्पष्टीकरण.—(१) जो शेतकरी त्याच्या शेतीच्या धंद्यांत बदल करण्याचा कोणताहि हेतू न बाळगतां मुख्यत्वें शेती करून आपली उपजीविका चालविण्याचें किंवा अंगमेहनतीनें शेतीचें काम करण्याचें तात्पुरतें बंद करील तो इसम किंवा ज्यास वार्धक्यामुळें, शारीरिक दुर्बलतेमुळें किंवा संघराज्याच्या सशस्त्र फौजेंत नोकरी करावी लागत असल्यामुळें आपली उपजीविका चालविण्यास किंवा अंगमेहनतीनें शेतीचें काम करण्यास प्रतिबंध होत असेल असा इसम या व्याख्येच्या अर्थकक्षेंत शेतकरी असण्याचें बंद होणार नाहीं.

(२) सरकारनें आकारणी ज्याचें नांवें करून दिली असेल असा इसम किंवा शेतकऱ्याच्या मालकीच्या जमिनी गहाणानें घेणारा इसम हा या व्याख्येच्या अर्थानुसार असा शेतकरी असणार नाहीं.

(३) संयुक्त कुटुंबांतील इसम, किंवा संयुक्त मालक किंवा संयुक्त कुळें यांच्या बाबतींत, जर कोणताहि इसम, संयुक्त मालक किंवा संयुक्त कूळ साधारणपणें अंगमेहनतीनें शेतीचें काम करील तर, असा इसम, संयुक्त मालक किंवा संयुक्त कूळ हें, जरी संयुक्त कुटुंबांतील इतर इसम किंवा इतर संयुक्त मालक किंवा संयुक्त कुळें साधारणपणें अंगमेहनतीनें शेतीचें काम करीत नसलें तरी, शेतकरी आहे असें समजलें पाहिजे.

(ब) "दिवाणी न्यायालय" या संज्ञेंत लघुवाद न्यायालयाचा समावेश होतो.

## भाग २.

### टंचाईच्या किंवा दुष्काळी परिस्थितींतील विवक्षित बाबतींत हुकूमनाम्यांची अंमलबजावणी आणि दावे दाखल करण्याचें काम स्थगित करणें.

विवक्षित हुकूमनाम्यांच्या बाबतींत कामकाज स्थगित करणें व विवक्षित दावे लांबणीवर टाकणें.

३. (१) पोट-कलम (५) मध्यें जी कोणतीहि तरतूद केली असेल ती खेरीजकरून ज्या क्षेत्रांत कलम (१), पोट-कलम (३) मध्यें उल्लेख केलेल्या कोणत्याहि आपत्तींमुळें राज्य सरकारनें जमीन महसुलाची सूट किंवा तहकुबी दिली असून त्याशिवाय टंचाईची किंवा दुष्काळी परिस्थिति असल्याची घोषणा केली असेल अशा कोणत्याहि क्षेत्रांत, हा भाग अंमलांत येण्यापूर्वी प्राप्त झालेल्या कोणत्याहि जबाबदारीच्या आधारें त्या क्षेत्रांतील कोणत्याहि दिवाणी न्यायालयानें कोणत्याहि, रकमेसाठीं दिलेल्या कोणत्याहि हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्याकरितां असलेल्या सर्व कारवाया, गहाणखताच्या अंमलबजावणींत गहाण देणाराचा गहाण सोडून घेण्याचा हक्क नष्ट करण्यासाठीं (Foreclosure) कोणताहि प्राथमिक हुकूमनामा अखेरचा करवून घेण्यासाठीं असलेल्या सर्व कारवाया आणि गहाणखताच्या अंमलबजावणींत गहाण देणाराचा गहाण सोडून घेण्याचा हक्क नष्ट करण्यासाठीं किंवा विक्रीसाठीं कोणत्याहि अखेरच्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठीं असलेल्या सर्व कारवाया यांत निर्णित ऋणको किंवा निर्णित ऋणकोपैकीं एक हा, सदरहू अधिनियम अशा रीतीनें अंमलांत येण्याच्या तारखेस शेतकरी असेल तर, अशा कारवाया, उक्त क्षेत्रांत हा भाग अंमलांत असलेल्या मुदतींत, स्थगित करण्यांत आल्या पाहिजेत.

(२) ज्यास पोट-कलम (१) लागू असेल अशा कोणत्याहि क्षेत्रांत,—

(अ) उक्त पोट-कलमांत उल्लेख केलेल्या कोणत्याहि हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठीं किंवा उक्त पोट-कलमांत उल्लेख केल्याप्रमाणें गहाण देणाराचा गहाण सोडून घेण्याचा हक्क नष्ट करण्यासाठीं दिलेला प्राथमिक हुकूमनामा अखेरचा करवून घेण्यासाठीं केलेला कोणताहि अर्ज, उक्त क्षेत्रांत हा भाग अंमलांत असेल तोपर्यंत उक्त क्षेत्रांतील कोणत्याहि दिवाणी न्यायालयानें दाखल करून घेतां कामा नये,

(ब) पैशाबद्दलचा कोणताहि दावा आणि गहाणखताची अंमलबजावणी करतांना, गहाण देणाराचा गहाण सोडून घेण्याचा हक्क नष्ट करण्यासाठीं किंवा विक्री करण्यासाठीं असलेला कोणताहि दावा, शेतकरी आपल्या सर्व स्थावर मालमत्तेची किंवा तिच्या कोणत्याहि भागाची विल्हेवाट लावण्याच्या बेतांत असेल तें खेरीजकरून उक्त क्षेत्रांत हा भाग अंमलांत राहील तोंपर्यंत, उक्त क्षेत्रांतील कोणत्याहि दिवाणी न्यायालयांत कोणत्याही शेतकऱ्याविरुद्ध दाखल करतां कामा नये आणि दाखल केला असल्यास, त्याबाबतचें कामकाज चालवितां कामा नये.

(३) कोणत्याहि हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यासाठींच्या कारवाया पोट-कलम (१) अन्वयें स्थगित करण्यांत आल्या असतील त्याबाबतींत, अशा हुकूमनाम्याची अंमलबजावणी करतांना केलेल्या आणि उभीं पिकें, शेतीचें उत्पन्न, जनावरें आणि नाशवंत स्वरूपाची इतर जंगम मालमत्ता यांच्या बाबतींत, मनाई आदेश ज्या तारखेस देण्यांत आला त्या तारखेस अस्तित्वांत असलेल्या सर्व जपत्या काढून घेण्यांत आल्या आहेत असें समजलें पाहिजे.

(४) पोट-कलम (१) ज्यास लागू करण्यांत आलें आहे अशा कोणत्याहि क्षेत्रांतील शेतकऱ्याविरुद्ध जेव्हां त्या क्षेत्रांत हा भाग अंमलांत आला तेव्हां प्रांतिक वादारीबाबत अधिनियम, १९२० अन्वयेंच्या ऋणकोनें केलेल्या अर्जान्वयें असो किंवा धनकोनें केलेल्या अर्जान्वयें अनिर्णीत राहिलेल्या सर्व कारवाया, ज्या मुदतींत हा भाग त्या क्षेत्रांत अंमलांत राहील त्या मुदतींत, स्थगित केल्या पाहिजेत.

(५) पोट-कलम (१) मधील कोणताहि मजकूर कोणत्याहि मालमत्तेसंबंधीं असलेल्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करतांना अशा मालमत्तेची विक्री केल्यानंतरच्या कारवाईस लागू होणार नाहीं.

हप्त्याबाबतचे हुकूमनामे.

४. कलम ३, पोट-कलम (१) मध्यें उल्लेख केलेल्या कोणत्याहि हुकूमनाम्याचे पैसे हप्त्यांनीं द्यावयाचे असतील त्या बाबतींत आणि त्यान्वयें येणें असलेला कोणताहि हप्ता, ह्या क्षेत्रांत हा भाग अंमलांत असतांना, देणें होईल तर, अशा हुकूमनाम्यांत कोणताहि मजकूर असला तरी असा हप्ता योग्य तारखेस देण्यांत न आला तर त्याबाबत कसुरी करण्यांत आली आहे असें समजतां कामा नये आणि असा प्रत्येक हप्ता, कलम १, पोट-कलम (४) अन्वयें या भागाचा अंमल त्या क्षेत्रांतून काढून घेतल्यापासून एक महिना संपल्यानंतर देणें होतो असें समजलें पाहिजे.

अटकेपासून माफी.

५. हा भाग ज्या क्षेत्रांत अंमलांत असेल अशा कोणत्याहि क्षेत्रांतील कोणत्याहि शेतकऱ्यास कलम ३, पोट-कलम (१) मध्यें उल्लेख केलेल्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करतांना, उक्त क्षेत्रांत हा भाग अंमलांत असेल अशा मुदतींत अटक करतां येणार नाहीं किंवा दिवाणी तुरुंगांत त्यास स्थानबद्ध करतां येणार नाहीं.

मुदत मोजणे.

६. (१) (अ) कलम ३, पोट-कलम (२) कंडिका (ब) मध्यें उल्लेख केलेल्या गहाणखताचीं किंवा गहाण देणाराचा गहाण सोडून घेण्याचा हक्क नष्ट करण्यासाठीं अंमलबजावणी करतांना पैशाबद्दल किंवा विक्रीबद्दल कोणत्याहि शेतकऱ्या-विरुद्ध कोणत्याहि क्षेत्रांतील दिवाणी न्यायालयांत केलेल्या दाव्यासाठीं, किंवा

(ब) कलम ३, पोट-कलम (१) मध्यें उल्लेख केलेल्या कोणत्याहि हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीबद्दल किंवा उक्त पोट-कलमांत उल्लेख केल्याप्रमाणें गहाण देणाराचा गहाण सोडून घेण्याचा हक्क नष्ट करण्यासाठीं किंवा विक्रीसाठींचा कोणताहि प्राथमिक हुकूमनामा अखेरचा हुकूमनामा करवून घेण्याबद्दल, कोणत्याहि क्षेत्रांतील दिवाणी न्यायालयांत, केलेल्या अर्जासाठीं, भारताचा मुदतीबाबत अधिनियम, १९०८, अन्वयें किंवा त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या इतर कोणत्याहि विधिअन्वयें विहीत केलेली मुदत मोजतांना, उक्त क्षेत्रांत हा भाग ज्या मुदतींत अंमलांत होता ती मुदत वगळण्यांत आली पाहिजे आणि कलम १, पोट-कलम (४) अन्वयें उक्त क्षेत्रांतून या भागाचा अंमल काढून घेतल्याच्या तारखेपासून एक महिन्याची मुदत संपण्यापूर्वींची, जर कोणतीहि मुदत कमी पडत असेल तर ती भरून काढण्यासाठीं तीस दिवसांहून अधिक नसेल अशी आणखी मुदत वाढविण्यांत आली पाहिजे.

(२) कलम ३, पोट-कलम (१) मध्यें उल्लेखिलेल्या कोणत्याहि हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठीं दिवाणी न्यायालयांत केलेल्या एखाद्या अर्जाकरितां व्यवहार प्रक्रिया संहिता, १९०८ च्या कलम ४८ मध्यें विहित केलेली बारा वर्षांची मुदत मोजतांना, उक्त क्षेत्रांत ज्या मुदतींत हा भाग अंमलांत राहील ती मुदत वगळण्यांत आली पाहिजे.

(३) उपरिनिर्दिष्ट बारा वर्षांची मुदत मोजतांना, मध्य प्रदेश हुकूमनाम्यांची अंमलबजावणी तात्पुरती लांबणीवर टाकण्याबाबत अधिनियम, १९५६ अन्वयें ज्या मुदतीपर्यंत कारवाया स्थगित करण्यांत आल्या असतील ती मुदत, कालाच्या ओघांत उक्त अधिनियम संपुष्टांत आला असला तरीहि, जणूं उक्त अधिनियम संपुष्टांत आला नाहीं असें समजून, वगळण्यांत आली पाहिजे.

हस्तांतरणावर निर्बंध.

७. कलम ३, पोट-कलम (१) मध्यें उल्लेखिलेल्या कोणत्याहि हुकूमनाम्यांत जो निर्णित ऋणको असेल अशा शेतकऱ्यानें, हा भाग ज्या क्षेत्रांत अंमलांत असेल अशा कोणत्याहि क्षेत्रांत, स्थावर मालमत्तेचें किंवा त्यांतील हितसंबंधाचें केलेलें हस्तांतरण हें, उक्त क्षेत्रांत हा भाग अंमलांत असेल त्या मुदतींत असा हुकूमनामा धारण करणाऱ्याविरुद्ध निरर्थक असेल.

विवक्षित हुकूमनाम्यांच्या रकमा देणें.

८. ह्या अधिनियमांतील कोणताहि मजकूर,—

(अ) एखाद्या हुकूमनाम्यान्वयें निर्णित ऋणकोनें स्वेच्छेनें देऊं केलेली कोणतीहि रक्कम स्वीकारण्यास किंवा उक्त रकमेची कोणतीहि तडजोड करण्यास, कोणताहि हुकूमनामा धारण करणारास प्रतिबंध करणार नाहीं ;

(ब) विश्वस्त व्यवस्थेसंबंधींच्या दाव्यांतून उद्भवणाऱ्या रकमेबद्दल असलेल्या हुकूमनाम्यास किंवा संयुक्त कूळ किंवा संयुक्त मालक यांच्या वतीनें चरितार्थाबद्दलच्या हुकूमनाम्यास किंवा शेतजमिनीच्या संयुक्त-कुळांमधील, किंवा नफ्याबद्दलच्या हुकूमनाम्यास किंवा अपकृत्यासाठींच्या नुकसानीबद्दलच्या किंवा अंशदानाबद्दलच्या हुकूमनाम्यास लागू होणार नाहीं ; किंवा

(क) ज्या गहाणखताच्या आधारावर असा हुकूमनामा मिळविला असेल अशा गहाणखतास अधीन राहून, ज्यानें गहाण ठेवलेल्या मालमत्तेचें हस्तांतरण आपल्या नांवें करून घेतलें असेल अशा नंतरच्या अभिहस्तांकितीच्या हातीं असलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेची विक्री करून, ज्या गहाण मालमत्ते-बाबतच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करणें असेल त्या हुकूमनाम्यास लागू होणार नाहीं.

## भाग ३.

### भाग २ खालीं न येणाऱ्या विवक्षित बाबतींत, हुकूमनाम्याची अंमलबजावणी स्थगित करणें आणि दावा दाखल करण्याचें काम लांबणीवर टाकणें.

भाग २ उपबंध ज्यांना लागू नाहींत अशा विविक्षित शेतकऱ्यास ते लागू करणें.

९. (१) कलम १, पोट-कलम (३) मध्यें उल्लेखिलेल्या कोणत्याहि आपत्तीमुळें राज्य सरकारनें, कोणत्याहि क्षेत्रांत जमीन महसूल तहकूब करण्याबद्दल किंवा त्यांत सूट देण्याबद्दल आदेश दिला असेल तर, उक्त क्षेत्रांत जो शेती करीत असेल अशा यथास्थिति, निर्णित ऋणकोच्या, प्रतिवाद्याच्या किंवा इसमाच्या बाबतींत भाग २ चें उपबंध हे, पोट-कलम (३) च्या उपबंधांस अधीन राहून शक्य असेल तेथवर लागू करण्यांत येतील. परंतु, उक्त क्षेत्रांत हा भाग अंमलांत असेल त्या मुदतींत भाग २ अन्वयें जी तरतूद करण्यांत आली असेल त्या रीतीनें व त्या मर्यादेपर्यंत, हुकूमनाम्याची अंमलबजावणी स्थगित करण्याबद्दल किंवा दावा दाखल करण्याचें काम लांबणीवर टाकण्याबद्दल त्याबाबतींत सक्षम क्षेत्राधिकार असलेल्या दिवाणी न्यायालयांकडे अशा इसमानें अर्ज केला असला पाहिजे आणि मागणी करण्यांत आलेले साहाय्य मंजूर करणें हें शेतकऱ्यांच्या दृष्टीनें हिताचें आहे याबद्दल खात्री झाल्यावर न्यायालयानें त्याप्रमाणें आदेश दिला असला पाहिजे.

(२) पोट-कलम (१) अन्वयें न्यायालयानें काम स्थगित करण्याबद्दल दिलेला प्रत्येक आदेश किंवा इतर आदेश हा, यथास्थिति निर्णित ऋणकोनें, प्रतिवाद्यानें किंवा इसमानें दाखल केलेल्या अर्जाच्या तारखेपासून अंमलांत येईल आणि तो जेव्हां हा भाग उक्त क्षेत्रांत लागू असण्याचें बंद होईल तेव्हां अंमलांत असणार नाहीं.

(३) ह्या कलमाच्या कारणासाठीं, भाग २ चे उपबंध जेथवर लागू करणें असेल तथवर त्या उपबंधांचा अर्थ लावतांना,—

(अ) कलम ६ अन्वयें वगळण्यांत यावयाची मुदत ही, पोट-कलम (१) अन्वयें केलेल्या अर्जाची तारीख व उक्त क्षेत्रास ज्या तारखेस हा भाग लागू असण्याचें बंद होईल ती तारीख किंवा न्यायालयानें ज्या तारखेस अर्ज नामंजूर केला असेल ती तारीख—या दोहोंपैकीं जी तारीख आधींची असेल ती तारीख—यांमधील मुदत असेल.

(ब) कलम ७ अन्वयें हस्तांतरणांवर बसविण्यांत आलेले निर्बंध हे, ज्यानें पोट-कलम (१) अन्वयें अर्ज केला असेल अशा शेतकऱ्यासच केवळ लागू होतील असें समजण्यांत आलें पाहिजे आणि ते, न्यायालयाकडे ज्या तारखेस अर्ज करण्यांत आला असेल त्या तारखेस व त्या तारखेपासून व उक्त क्षेत्रांत हा भाग लागू होण्याचें जेव्हां बंद होईल ती तारीख किंवा न्यायालय ज्या तारखेस अर्ज नामंजूर करील ती तारीख—या दोहोंपैकीं जी तारीख आधींची असेल त्या तारखेपर्यंत—अंमलांत राहतील.

## भाग ४.

### संकीर्ण.

नियम. १०. (१) राज्य सरकारास, ह्या अधिनियमाचे उपबंध अंमलांत आणण्यासाठीं नियम करण्याचा अधिकार आहे.

(२) या कलमान्वयें केलेले सर्व नियम, ते केल्यानंतर होईल तितक्या लवकर, विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढें, तीस दिवसांहून कमी नसेल इतक्या मुदतीपर्यंत ठेवले पाहिजेत आणि ते ज्या अधिवेशनांत अशा रीतीनें ठेवण्यांत आले असतील त्या अधिवेशनांत किंवा त्याच्या लगतनंतरच्या अधिवेशनांत राज्य विधानमंडळ जे फेरफार करील त्यांस अधीन असतील.

रद्द करणें व बचाव. ११. सौराष्ट्र हुकूमनाम्याची अंमलबजावणी (तात्पुरती लांबणीवर टाकण्याबाबत) अधिनियम, १९५२ याद्वारें रद्द करण्यांत आला आहे:

परंतु, अधिनियम अशा रीतीनें रद्द करण्यांत आल्यामुळें—

(अ) अशा रीतीनें रद्द झालेल्या कोणत्याहि अधिनियमांचा पूर्वीचा अंमल किंवा तदन्वयें योग्य रीत्या केलेली किंवा करू दिलेली कोणतीहि गोष्ट, किंवा

(ब) अशा रीतीनें रद्द झालेल्या कोणत्याहि अधिनियमान्वयें संपादन केलेला कोणताहि हक्क व विशेषाधिकार किंवा पत्करलेली किंवा प्राप्त झालेली कोणतीहि जबाबदारी किंवा बंधन, किंवा

(क) असा कोणताहि हक्क, विशेषाधिकार, बंधन किंवा जबाबदारी यांबाबतची कोणतीहि चौकशी, वैध कारवाई किंवा उपाययोजना ;

यांस बाध येणार नाहीं, आणि जणूं हा अधिनियम संमत झाला नव्हता असें समजून कोणतीहि अशी चौकशी कायदेशीर कारवाई किंवा उपाययोजना ही, करतां येईल, चालू ठेवतां येईल किंवा अंमलांत आणतां यईल:

आणखी असें कीं, मागील परंतुकास अधीन राहून, अशा रीतीनें रद्द करण्यांत आलेल्या कोणत्याहि अधिनियमान्वयें केलेली कोणतीहि गोष्ट किंवा केलेली कोणतीहि कारवाई ही (दिलेल्या अधिसूचना व केलेले नियम धरून) जेथवर ती ह्या अधिनियमाच्या उपबंधांपैकीं कोणत्याहि उपबंधांशीं विसंगत असणार नाहीं तेथवर, जेव्हां अशी गोष्ट किंवा कारवाई करण्यांत आली तेव्हां राज्याच्या संबंधित भागांत उक्त उपबंध अंमलांत होते असें समजून, ती ह्या अधिनियमाच्या तत्सम उपबंधान्वयें करण्यांत आलेली गोष्ट किंवा कारवाई आहे असें समजण्यांत आलें पाहिजे. आणि ती ह्या अधिनियमान्वयें केलेल्या कोणत्याहि गोष्टीमुळ किंवा कारवाईमुळ रद्द करण्यांत आल्याशिवाय आणि रद्द करण्यांत येईतोंपर्यंत त्याप्रमाणें अंमलांत असण्याचें चालू राहील.

१२. मुंबईच्या हुकूमनाम्यांची अंमलबजावणी तात्पुरती लांबणीवर टाकण्याबाबत सन १९५९ अध्यादेश, १९५९ हा, याद्वारें रद्द करण्यांत येत आहे आणि सामान्य परिभाषा चा मुंबई अधिनियम, १९०४ याचीं कलमें ७ व २५ चे उपबंध हे, जणूं उक्त अध्यादेश हा अध्यादेश अधिनियम होता असें समजून अशा रीतीनें (अध्यादेश) रद्द करण्यास लागू होतील. क्रमांक ४ रद्द करणें.

(२) मध्यप्रदेश हुकुमनाम्यांची अंमलबजावणी तात्पुरती लांबणीवर टाकण्याबाबत अधिनियम, १९५६ हा पुन्हा अंमलांत येईल.

(True translation)
P. S. THORAT,
Examiner of Books and Publications, Bombay.